**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.27**
https://www.srjis.com/issues_data/220
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL AUG-SEPT 2023, Vol-11/59
https://doi.org/10.5281/zenodo.8424371

# शिक्षण स्वातंत्र्याचा उदय

**डॉ. सौ. तिखे निलिमा नारायण**
*मार्गदर्शिका, सुभाष अण्णा कुल ऑफ एज्युकेशन,मधुकर नगर, पाटस, ता. दौंड, जि. पुणे.*
**सौ. नीता यशवंत चिंचोलीकर**
***संशोधिका,*** *सहशिक्षिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाची, जिजामाता प्राथमिक शाळा, खडकी, पुणे ३.*

**Paper Received On:** 25 August 2023
**Peer Reviewed On:** 27 September 2023
**Published On:** 01 October 2023

**प्रस्तावना:**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर नागरिकांची निरक्षरता दूर करण्यासाठी सातत्याने वेगवेगळे कार्यक्रम आखले गेले. त्यामध्ये विविध शिक्षण आयोग नेमण्यात आले. ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' (आर.टी.ई. ॲक्ट 2009) हा कायदा संमत केला गेला. या कायद्याने प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षणाचा अधिकार मिळाला. १ एप्रिल २०१० पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू आहे. या कायद्यानुसार शैक्षणिक गुणवत्ता विकासाशी संबंधित बालकांचा सर्वांगीण विकास हा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी विविध उपक्रम विविध योजनेद्वारे सर्व सुसज्ज सुविधांयुक्त प्रभावी व सृजनात्मक शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याला मिळावे. ही एक प्रकारची शैक्षणिक क्रांती आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP, 2020) NEP Means "National Education Policy, 2020" असा आहे. हे धोरण २९ जुलै, २०२० रोजी मंजूर करण्यात आले. भारताला जागतिक स्तरावर ज्ञानाच्या बाबतीत सुपर पॉवर बनवण्यासाठी शैक्षणिक ढाच्याच्या नियमांमध्ये व प्रशासकीय व्यवस्थांमध्ये अनेक सुधारणा आणि आमूलाग्र बदल करण्यात आले. या शतकातील शाश्वत विकास हे ध्येय प्राप्त करणे शक्य होईल. अशी समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हेच या धोरणाचे वैशिष्ट्य व उद्दिष्ट्य आहे. त्यामुळे या धोरणांत जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम समाविष्ट करण्यात आला आहे. सर्वांसाठी समावेशक आणि समान अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधीना प्रोत्साहन देण्याचे २०३० पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण करावयाचे आहे.

*Copyright@2023 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**NEP 2020 ची ठळक वैशिष्ट्येः**

शिक्षण ही एक सार्वजनिक सेवा आहे. भारताच्या समृध्द व वैविध्यपूर्ण, प्राचीन आधुनिक संस्कृती, न्यायव्यवस्था आणि परंपरा यांचा अभिमान असणे सुशासन व सशक्तीकरणाच्या माध्यमांतून नाविन्यपूर्णता व चौकटीबाहेरच्या विचारांना प्रोत्साहन करणे. शिक्षण प्रणालीची अखंडता, पारदर्शकता आणि संशोधनाची कार्यक्षमता, सार्वजनिक प्रकटीकरणाच्या माध्यमांतून सुनिश्चित करण्यासाठी सुलभ परिणामकारक नियमांची चौकट बसविली.

१ गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आणि विकासासाठी उत्कृष्ट दर्जाचे संशोधन.
२ प्रत्येक विद्यार्थ्यातील क्षमता व विविध गुण ओळखून प्रेरणा देणे.
३ विद्यार्थ्यांना अध्ययनाचा मार्ग आणि कार्यक्रमाची मुभा असेल.
४ ज्ञानाच्या क्षेत्रामधील हानीकारक उच्चनिचता नसणार व त्यांच्यातील भेदभाव नष्ट करणे.
५ प्रत्येक विद्यार्थ्यासाठी मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या गोष्टींना इयत्ता ३ री पर्यंत सर्वोच्च प्राधान्य देणे.
६ बहुशाखीय व समग्र शिक्षणाचा विकास
७ घोकमपट्टीऐवजी किंवा परिक्षेसाठी शिकण्याऐवजी संकल्पना समजून घेण्यावर भर.
८ कल्पकता आणि नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन.
९ नैतिकता आणि मानवी घटनात्मक मूल्ये.
१० समता व न्याय.
११ अध्ययन व अध्यापनात बहुभाषिकत्त्व व भाषा शक्तींना प्रोत्साहन.
१२ तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर.
१३ संवाद, सहकार्य, सामुहिक कार्य आणि लवचिकता अशी जीवनमूल्ये.
१४ सातत्यपूर्ण मुल्यांकनावर भर.
१५ सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये पूर्ण समानता आणि सर्वसमावेशकता असेल .
१६ शिक्षक आणि प्राध्यापक हे शिक्षण प्रक्रियेचे केंद्र मानणे.
१७ शिक्षण प्रणाली पारदर्शकता व अखंडता आणणे.
१८ प्रारंभिक बाल्यावस्थेचे संगोपन आणि शालेय शिक्षण ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व पातळ्यांवरून शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता,

**NEP 2020 च्या अमंलबजावणीचे विश्लेषणः**

धोरणाची यशस्वितता ही प्रभावीपणे अंमलबजावणीवर अवलंबून असते. धोरणाची उद्दिष्टे सुस्पष्टपणे आणि टप्याटप्याने साध्य करण्याकरीता धोरणाच्या प्रत्येक पैलूंची अंमलबजावणी तत्त्वानुसार, तपशिलवार तयार करण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य अशा दोन्ही स्तरावर, इतर संबंधित मंत्रालयाच्या संयोगाने आणि त्यांच्याशी सल्लामसलत करून, तसेच वेगवेगळ्या विषयांसाठी तज्ज्ञांची समिती स्थापन केली जाईल. MHRDA आणि राज्याकडून नियुक्त केलेल्या गटाद्वारे प्रत्येक कृतीसाठी अंमलबजावणीच्या प्रगतीचे एकत्रितपणे वार्षिक परिक्षण केले जाईल. आणि CABE ला परिक्षणाची माहिती कळवली जाईल. सन २०३०-२०४० च्या दशकामध्ये संपूर्ण धोरण कार्यान्वित झाले असेल आणि त्यांनतर अजून एक व्यापक परिक्षण केले जाईल.

धोरणाच्या प्रत्येक मुद्दयांमध्ये अनेक कृती समाविष्ट आहेत. प्रत्येक कृतीसाठी आधीच्या कृतीची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. धोरणातील मुद्दे क्रमवारीने लावले जातील, तसेच पहिल्यांदा अतिशय महत्त्वाची व तातडीची कामे हाती घेतली जातील. हे एक सर्वांगीण धोरण असून त्याचे भाग एकमेकांशी जोडलेले असल्यामुळे तुकड्यातुकड्यांने त्याची अंमलबजावणी न करता पूर्णपणे अंमलबजावणी केल्यावरच इच्छित उद्दिष्टे साध्य करता येतील.

**NEP 2020 च्या अभ्यासाची रचना व आकृतीबंधः**

पूर्वीची १० + २ अशी शैक्षणिक संरचनेऐवजी नविन अध्यापनशास्त्रीय संरचना ५ + ३ + ३ + ४ अशी शैक्षणिक व्यवस्था असणार आहे. नर्सरी ते दुसरी मुलभूत शिक्षण, त्यानंतर इयत्ता तिसरी ते पाचवी प्रारंभिक शाळा, इयत्ता सहावी ते आठवी माध्यमिक शिक्षण, इयत्ता नववी ते बारावी उच्च माध्यमिक शिक्षण याप्रमाणे संरचना असेल.

१ बोर्ड परिक्षा फक्त बारावीच्या वर्गाची असेल.

२ इयत्ता दहावीचे बोर्ड रद्द तसेच एम.फिल पदवीसुध्दा रद्द.

३ महाविद्यालयीन पदवी ३ ते ४ वर्षाची असेल.

४ इयत्ता पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना केवळ त्यांच्या मातृभाषेत शिकवले जाईल.

५ इयत्ता नववी ते बारावीच्या सत्र परिक्षा असतील.

६ पदवीच्या पहिल्या वर्षात प्रमाणपत्र मिळेल, दुसऱ्या वर्षी पदविका तर तृतीय वर्षी पदवी प्रमाणपत्रावर शिक्कामोर्तब.

७ संशोधन अभ्यासासाठी चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम तर नोकरीसाठी तीन वर्षाचा अभ्यासक्रम कालावधी.

८ NEP २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांना एखाद्या कोर्सच्या मध्यात दुसऱ्या कोर्सची आवश्यकता भासल्यास पहिला कोर्समध्ये ब्रेक घेऊन तो करता येईल.

९ उच्च शिक्षणामध्ये Higher Education 2035 पर्यंत एकूण सकल पटनोंदणी Gross Enrollment Ratio, 2035 पर्यंत ५० टक्के पोहाचविण्याचे उद्दिष्ट असणार आहे.

१० उच्च शिक्षणात सुधारणा केल्या आहेत. उदा. (Graded Educaton) श्रेणीबध्द शिक्षण, (Academic) शैक्षणिक, (Administration) प्रशासकीय आणि (Financial Autonomy) आर्थिक स्वायतत्ता समाविष्ट आहे.

११ ई-कोर्सेस प्रादेशिक भाषांमध्ये सुरू केले जातील तसेच आभासी वर्ग व Vertual Lab विकसित केल्या जातीलफ

१२ राष्ट्रीय शैक्षणिक मंच (NETF) सुरू होईल.

१३ सर्व सरकारी, खाजगी आणि मान्यताप्राप्त संस्थांसाठी समान नियम असतील.

१४ मल्टीडिसिप्लिनरी अभ्यास म्हणजे एकाच वेळी वेगवेगळे विषय एकत्रितपणे शिकता येतील. त्यामुळे आर्थिक किंवा अन्य कारणांमुळे होणारी गळती कमी होईल.

१५ बहुभाषिक शिक्षण हे अध्यापन करताना एकाच भाषेच्या माध्यमातून विविध प्रादेशिक भाषांचा वापर करता येणार.

Copyright@2023 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

१६ वकिल व वैद्यकिय शिक्षण वगळता इतर उच्च शिक्षण हे एका छताखाली घेता येणार.

१७ शिक्षणातील गुंतवणूक जी.डी.पी.च्या ४ टक्क्यांऐवजी ६ टक्के करणार.

१८ विद्यार्थ्यांचे प्रगतीपुस्तक बदलणार.

१९ शिक्षकांसोबत विद्यार्थीसुध्दा स्वतःचे मुल्यमापन करतील.

२० सर्व महाविद्यालयांसाठी एकच सामाईक प्रवेश परिक्षा NTA घेणार मात्र ही परिक्षा ऐच्छिक असेल.

**अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेत तंत्रज्ञान आणि ऑनलाईन संसाधनाचा वापरः**

शिक्षणाच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापराला आणि एकात्मिकरणाला पाठिंबा देऊन त्याचा अवलंब केला जाईल. डिजिटल भारत मोहिमेमुळे संपूर्ण राष्ट्राचे डिजिटलदृष्ट्या सक्षम व ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतर होण्यास मदत होत आहे. या रूपांतरामध्ये शिक्षण एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. परंतु शैक्षणिक प्रक्रिया आणि निष्पत्ती यामध्ये सुधारणा करण्यासाठी तंत्रज्ञाचा मोठा हात असेल. अशा प्रकारे तंत्रज्ञान आणि शिक्षणातील संबंध सर्व स्तरावर दोन्ही बाजूने काम करतील.

दर्जेदार शिक्षण द्यावयाचे असेल तर शिक्षणाची पर्यायी माध्यमे ठेवणे गरजेचे आहे. जेव्हा कधी व कुठे पारंपारिक आणि प्रत्येक शिकवण्याच्या माध्यमांचा वापर करणे शक्य नसेल तेव्हा तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या फायद्यांचा लाभ घेण्याचे महत्त्व राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने मान्य करत तंत्रज्ञानाशी संबंधित जोखमा व धोक्याची दखल घेतली आहे. विद्यमान डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि ICT आधारित शैक्षणिक उपक्रमाचा दर्जा विस्तार करणे. ऑनलाईन शिक्षणासाठी पथदर्शी अभ्यास, डिजिटल पायाभूत सुविधा, अध्यापन प्लॅटफॉर्म आणि साधने. मजकूर निर्मिती डिजिटल भांडार, व्हर्च्युअल प्रयोगशाळा, शिक्षकांना प्रशिक्षण व प्रोत्साहन, ऑनलाईन परिक्षा व मूल्यांकन, अध्ययनाची मिश्र मॉडेल्स व मानके निश्चित करणे इ. गोष्टी कराव्या लागतील.

**NEP 2020 प्रौढ शिक्षणासाठी तरतूदः**

साक्षरता आणि मुलभूत शिक्षण हे ताकदवान घटक असून ते विकासाच्या इतर सर्व प्रयत्नांच्या यशात वाढ करते. साक्षरता आणि मुलभूत शिक्षण या गोष्टी व्यक्तीसाठी वैयक्तिक नागरी, आर्थिक व निरंतर अध्ययनाच्या संधीचे नवे जग निर्माण करतात. प्रौढ शिक्षणामुळै वैयक्तिक व व्यावसायिक प्रगती होऊ शकते. समाज व देशपातळीवर प्रौढ शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. १०० टक्के साक्षरता करण्याचे हे अतिशय महत्त्वाचे ध्येय वेगाने गाठण्यासाठी, शिक्षण मजबूत नाविन्यपूर्ण सरकारी योजना, पुढाकार - विशेषतः समुदायाचा सहभाग, तंत्रज्ञानाचा सुलभ व लाभदायक समावेश, इ. गोष्टी सुरू केल्या जातील. सरकारी आणि धर्मादाय पुढाकारांद्वारे क्राउडसोर्सिंग व स्पर्धांच्या माध्यमांतून प्रौढ शिक्षण तंत्रज्ञानावर आधारित दिले जाईल.

**NEP 2020 अंतर्गत मानके व अधिस्विकृतीः**

सार्वजनिक शिक्षण व्यवस्था हा एक सक्रिय लोकशाही समाजाचा पाया आहे. राष्ट्रासाठी सर्वोत्तम शैक्षणिक निष्पत्ती मिळण्यासाठी कार्यपध्दतीचे परिवर्तन आणि सशक्तीकरण करणे आवश्यक आहे. त्याचवेळी खाजगी देणगी आधारित शाळा क्षेत्राला महत्त्वपूर्ण लाभदायक भूमिका निभावण्यासाठी प्रोत्साहित व सक्षम करणे आवश्यक आहे. शैक्षणिक निष्पत्तीमध्ये सातत्याने सुधारणा करणे हे शालेय शिक्षण नियामक व्यवस्थेचे उद्दिष्ट आहे. या व्यवस्थेमुळे शाळांवर अतिरिक्त बंधने लादली जाऊ नये, नाविन्यपूर्ण शोध लावण्यावर प्रतिबंध घातला जाऊ नये, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या मनोबलाचे खच्चीकरण केले जाऊ नये, उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यात यावा यासाठी विश्वासपूर्ण पध्दतीने सशक्त बनून पूर्ण पारदर्शकपणे अंमलबजावणी करणे, व्यवस्थेची एकात्मता अबाधित राखणे हे उद्दिष्ट आहे.

विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम यशस्वीपणे शिकण्यासाठी अभ्यासक्रमात गुंतवून ठेवणारे अध्यापन शास्त्र, सातत्यपूर्ण रचनात्मक मूल्यांकन आणि विद्यार्थ्यांना पुरेसा पाठिंबा याची गरज असते. विद्यार्थ्यांचे स्वास्थ व सामाजिक आरोग्य यासारख्यां गोष्टींना प्रोत्साहन देणाऱ्या क्षमतांचा विकास व चांगला नैतिक पाया हे उच्च दर्जाच्या अध्ययनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व विद्यार्थ्यांना यश मिळविण्यासाठी नविन अभ्यासक्रमाची गरज भासणार आहे. उच्च शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकांची निर्णायक भूमिका असल्याची दखल घेऊन त्यांच्या भरती व करिअरची व्यवस्था लावण्यासाठी विविध गटांना योग्य प्रतिनिधीत्व मिळवून देण्यासाठी गेल्या काही वर्षात विविध उपक्रम राबविले आहे. शिक्षकांना उत्साही, सहभागी, प्रेरित आणि सक्षम करण्यासाठी विविध उपक्रमांची शिफारस केली आहे.

१ मुलभूत उपाय म्हणजे सर्व HEI पायाभूत सोयीसुविधा सुसज्ज ठेवल्या जातील.

२ अध्यापन कर्तव्याबाबत अतिरेक केला जाणार नाही.

३ शिक्षकांना पाठ्यपुस्तक व वाचनसामुग्री निवडण्याचे, असाईनमेन्ट व मूल्यांकनासह मंजूर चौकटीत राहून अध्यापनात शास्त्रीय दृष्टिकोनाची रचना करण्याचे स्वातंत्र्य देण्यात येईल.

४ शिक्षकांना योग्य पुरस्काराने व पदोन्नतीने सन्मानित केले जाईल.

**NEP 2020 अंतर्गत समग्र किंवा पूर्ण दृष्टिकोन आणि संकल्पनाः**

भारताला ज्ञानाद्वारे महासत्ता बनवण्यासाठी न्याय आणि चैतन्यमय समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यासाठी व भारतीय असल्याचा सखोल अभिमान विद्यार्थ्यांच्या केवळ विचारांमध्येच नव्हेतर त्यांच्या व्यवहारात, बुध्दीमध्ये आणि कृतीमध्ये देखील रूजवणे तसेच मानवी हक्क, शाश्वत विकास आणि जीवनमान यांच्याशी पूर्ण बांधिलकीचे समर्थन करण्याचे ज्ञान, कौशल्य मूल्य आणि स्वभाव विकसित या सर्व भारतीय मूल्यांना विकसित करून सर्वांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देणे. त्यामुळे एका अर्थाने या धोरणांमुळे विद्यार्थी वैश्विक नागरीक बनतील.

**१ व्यावसायिक शिक्षण** : विद्यार्थ्यांना व्यावसायिक म्हणून तयार करण्यासाठी संबंधित शिक्षणामध्ये नितीमूल्ये आणि सार्वजनिक उद्देश यांचे महत्त्व आहे. तसेच शाखेच्या विषयाचे शिक्षण आणि व्यावहारिक शिक्षण यांचा समावेश असणे आवश्यक आहे. बहुशाखीय विचार, चर्चा, वादविवाद, संशोधन आणि नाविन्य यांचादेखील समावेश आवश्यक आहे. यामध्ये कृषी शिक्षणाचे, त्याच्या संलग्न शाखांसह पुर्नरूज्जीवन केले जाईल. कायद्याचे शिक्षण जागतिकदृष्ट्या स्पर्धात्मक, व्यापक उलब्धता आणि वेळेवर न्यायदान करण्यासाठी सर्वोत्तम पध्दती व नविन तंत्रज्ञान स्विकारणे असेल. आरोग्य सेवेच्या शिक्षणाची पुर्नःकल्पना करण्याची आवश्यकता आहे, तसेच तांत्रिक शिक्षणात भारताच्या एकंदर विकासासाठी तरूणांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी पदवीपूर्व शिक्षणात विविध विषय समाविष्ट केले जातील.

२ **भारतीय भाषा, कला आणि संस्कृतीस प्रोत्साहनः** भारताच्या सांस्कृतिक संपत्तीचे जतन आणि प्रचार करणे ही देशाची प्राथमिकता असेण आवश्यक आहे. कारण देशाची ओळख ही अर्थव्यवस्थेसाठी खऱ्या अर्थाने महत्त्वाचे आहे. वैयक्तिक आणि सामाजिक कल्याण या दोन्हींसाठी सांस्कृतिक जागरूकता आणि अभिव्यक्ती यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कला हे संस्कृतीचे शिक्षण देण्याचे प्रमुख माध्यम तर भाषा अर्थातच संस्कृतीशी अतूटपणे जोडलेली आहे. यासाठी लोकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग तसेच तंत्रज्ञान आणि क्राउडसोर्सिंग यांच्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करतात.

३ **तंत्रज्ञान वापर आणि एकत्रिकरणः** माहिती व संचार तंत्रज्ञान आणि इतर आधुनिक क्षेत्रांमध्ये भारत जागतिक पातळीवर नेतृत्त्व करत आहे. तांत्रिक विकासाच्या तीव्र वेगाला, तंत्रज्ञानाचे जाणकार शिक्षक व उद्योजकासहित विद्यार्थी उद्योजगांच्या कल्पकतेची जोड मिळाल्यावर, तंत्रज्ञानाच्या शिक्षणावर अनेक प्रकारे परिणाम होईल. त्यासाठी तांत्रिक व शैक्षणिक आघाडीवर विविध क्षेत्रांमध्ये विस्तृत संशोधन होणे आवश्यक आहे. यासाठी तंत्रज्ञानाच्या वापराचा भर प्रामुख्याने अध्यापन-अध्यन आणि मूल्यांकनावर केल्यावर गुणवत्तेची प्रक्रिया सुधारेल.

**NEP २०२० अंतर्गत शिक्षणाद्वारे शाळासंकुल/कल्स्टरच्या माध्यमांतून कार्यक्षम संसाधन आणि प्रभावी व्यवस्थापनः**

शाळा संकुल/कल्स्टरची स्थापना आणि संकुलामधून साधनांची देवाणघेवाण यामुळे अनेक फायदे मिळणार आहेत. मुलांना विविध सुविधा साधने उपलब्ध होतील, तसेच शाळा संकुल व्यवस्थापन समित्या, स्थानिक हितसंबंधांकडून देखरेख व पर्यवेक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि पुढाकार, शाळांचे प्रमुख, शिक्षक, मदतनीस कर्मचारी, पालक आणि स्थानिक नागरिक अशा प्रकारचा मोठा समुदाय तयार केल्याने शालेय व्यवस्थेला ऊर्जा मिळेल व सामर्थ्य प्राप्त होईल. आणि तेही साधने कार्यक्षमतेने वापरून विद्यार्थ्यांची प्रगती घडवून आणता येईल. शाळा ही सर्व समुदायांची एक उत्साहभरीत आणि सन्मानाची जागा असावी जेणेकरून शाळेला सामाजिक चेतनाकेंद्राचे स्वरूप प्राप्त होईल.

**NEP 2020 आव्हाने आणि संधीः**

कोणत्याही समाजाच्या आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा एक अत्यावश्यक आणि अपरिहार्य घटक आहे. भारत सरकारने मंजूर केलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हा या दिशेने एक महत्त्वाचा उपक्रम आहे. या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी होते यावर त्याचे यशापयश अवलंबून असेल.

**संधी :**

१ लोकशाही समाजात प्रत्येकाला समानसंधी मिळायला हव्यात जेणेकरून प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार वापरता येईल.
२ आकांक्षा आणि क्षमतांशी सुसंगत दर्जेदार शिक्षणाचा लाभ घेता येईल.
३ बहुभाषिकीय शिक्षणामुळे ज्ञानवृध्दीत वाढ होईल.
४ बहुआयामी जगासाठी विज्ञान, समाजशास्त्र आणि खंड यामध्ये समग्र शिक्षणास संधी.
५ विद्यार्थ्याना आवडीनुसार आयुष्यात पुढे जाण्यासाठी स्वतःचा मार्ग निवडणे सोयीस्कर होईल.
६ विद्यार्थ्यांची व्यावसायिक प्रगतीत वाढ होण्यासाठी संधी उपलब्ध.
७ पदव्युत्तर संशोधनास वाव. उदा. पीएच.डी.
८ कौशल्यदृष्टीत शिक्षणांमुळे रोजगाराच्या संधीस वाव व बेरोजगारी कमी होण्यास मदत.
९ भारतीय भाषा, कला व संस्कृतीच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिल्यास पर्यटन व्यवस्थेत संधी उपलब्ध.
१० यथायोग्य व सर्वसमावेशक शिक्षणांमुळे प्रत्येक विद्यार्थ्यांस शिक्षणाची संधी.

**आव्हानेः**

१ सन २०३० पर्यंत अधिकाधिक विद्यार्थी भारतातील शाळांमध्ये नोंदणी करतील त्यासाठी शिक्षकांची आवश्यकता अधिक असेल. पदवीधर व पदव्युतर शिक्षण हा चार वर्षाचा कालावधी असणारा अभ्यासक्रम आहे त्यानुसार अध्यापनाच्या तुलनेत वैचारिक आणि अनुभवात्मक अध्यापन कठीण असेल.

२ प्रमाणपत्र व डिप्लोमाच्या मूल्यांवर नेमकी कोणती संधी उपलब्ध असणार केवळ पदवी घेऊनच एखादी नोकरी मिळू शकते हा एक धोकादायक निर्णय आहे.

३ मर्यादित संसाधने पाहता उच्च शिक्षणासाठी NEP २०२० च्या प्रस्तावांची पूर्णपणे अंमलबजावणी करणे अवघड आहे.

४ अध्यापनशास्त्रीय बदल कठीण आहेत.

५ विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या मूल्यमापन मापदंडाचा पुर्नविचार करावा लागेल.

६ प्रत्येक विद्यार्थ्यांच्या विविध शिक्षणाची गती लक्षात घेऊन शिक्षण परिसंस्थेची रचना करावी लागेल.

७ कार्यालयीन कर्मचारी व पालकांसह संबंधितांच्या मानसिकतेत सुरूवातीपासून निश्चित बदल घडवून आणणे ही एक महत्त्वाची कृती असेल.

८ सर्व स्तरांवर अध्यापन व्यवसायात प्रवेश करण्यासाठी आपल्याला अतिशय उत्तम व हुशार लोकांना नियुक्त करणे आवश्यक आहे.

९ अतिदुर्गम ठिकाणी काम करताना वैयक्तिक व व्यावसायिक अडथळे दूर करण्यासाठीदेखील कार्य करणे आवश्यक आहे.

१० नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश हे राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील विविध भागधारकांना तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे अवघड काम आहे.

**NEP 2020 व समाजः**

अभ्यासक्रमातील ओझे कमी करून खेळ, कृती व शोध यावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येईल. तसेच संबोध, आकलन, उपाययोजना भर, गणिती दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशील विचार, चिंतनशील विचार, सहसंबधांत्मक अध्ययन, संवाद कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम असल्याने केवळ पाठांतर करून परिक्षेत मिळणाऱ्या गुणांचे अवास्तव महत्त्व कमी होईल. कौशल्य व क्षमता विकासांवर भर दिल्यामुळे अध्ययन निष्पत्तीच्या आधारे मुलांची गुणवत्ता तपासली जाणार आहे. केवळ गुण न नोंदविता क्षमता/कौशल्य विकासनाची स्थिती, प्रगती पुस्तकात नोंदवून सर्वांगीण विकासाच्या प्रगतीस चालना दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य दिले जाणार आहे.

१ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी देश व राज्य पातळीवरील जबाबदाऱ्यांचे विभाजन "SARTHAQ" पुस्तिकेमध्ये देण्यात आलेले आहे.

२ आदिवासी विकास विभागाकडून खाजगी व शासकीय आश्रमशाळा व वसतीगृह चालविली जातात.

३ कौशल्य विकास व उद्योजकता विभागाद्वारे व्यावसायिक शिक्षणाला अधिक महत्त्व देण्यात आले आहे.

४ महिला व बालविकास विभागामार्फत अंगणवाडी, बालवाटीका व पूर्व प्राथमिक शिक्षणावर प्रशासकिय नियंत्रण असेल.

५ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या धोरणाच्या अंतर्गत शालेय शिक्षण विभागासोबतच राज्यातील काही शाळांचे नियंत्रण इतर विभागाच्या अंतर्गत असल्यामुळे या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांना समन्वय व सनियंत्रण मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**

www.education.gov.in

**Cite Your Article as:**
Dr. Sau. Tikhe Neelima Narayan, & Sau. Neeta Yashwant Chincholikar. (2023). SHIKSHAN SWATANTRYACHA UDAY. Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,, 11(59), 58–65. https://doi.org/10.5281/zenodo.8424371

*Copyright@2023 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*